**ठळक बातम्या**

- भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप/या कराराचं सर्व स्तरातून स्वागत

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यावर रवाना

- सरकारच्या मोहिमेमुळे नक्षलग्रस्त भागातलं भीतीचं वातावरण संपलं असून विकासाची नवी पहाट उजाडली असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- महाराष्ट्रात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी मतदान शांततेत सुरू

**आणि**

- मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपाच्या ऋतु तावडे आणि उपमहापौर पदासाठी शिवसेनेचे संजय मोरे यांचे अर्ज दाखल

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यात आलं आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये ही माहिती दिली. या मसुद्यानुसार अमेरिकेत भारतीय वस्तूंवर लादलेलं आयात शुल्क कमी करुन ते १८ टक्क्यांपर्यंत कमी केलं जाईल, असं ते म्हणाले. यामुळे वस्त्रोद्योग आणि वस्त्रप्रावरणं, चामडं आणि पादत्राणं, प्लॅस्टिक आणि रबरापासून बनवलेल्या वस्तू, सेंद्रिय पदार्थ, गृह सजावट आणि हस्तशिल्प वस्तू या क्षेत्रांसाठी मोठी बाजारपेठ खुली होईल असा विश्वास गोयल यांनी व्यक्त केला. याशिवाय जेनेरिक औषधं, रत्नं, हिरे आणि विमानाचे भाग यासह विविध श्रेणीतल्या वस्तूंवरचं शुल्क पूर्णपणे रद्द केलं जाणार असल्यानं भारताच्या निर्यातीला आणि मेक इन इंडिया अभियानाला मोठी चालना मिळेल, तसंच हा करार कृषी आणि दुग्धजन्य उत्पादनांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या हिताचं रक्षण करेल असं गोयल यांनी म्हटलं आहे. या भागीदारीमुळे भारतीय निर्यातदारांसाठी विशेषतः एम एस एम ई, शेतकरी आणि मच्छिमारांसाठी ३० ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सची बाजारपेठ खुली होईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या अंतरिम व्यापार कराराचं सर्व स्तरातून स्वागत होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराच्या मसुद्याचं स्वागत केलं असून, ही बाब दोन्ही देशांच्या दृष्टीनं महत्त्वाची आणि आनंदाची असल्याचं म्हटलं आहे. हा करार म्हणजे भारताच्या आर्थिक प्रवासातला महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचं संरक्षण मंत्री **राजनाथ सिंग** यांनी म्हटलं आहे. तर या करारामुळे भारत आणि अमेरिका यांच्यात परस्परांना लाभदायक भागीदारी साकारेल, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ **एस जयशंकर** यांनी व्यक्त केलं आहे.

देशासाठी शेतकऱ्यांचं हित अत्यंत महत्त्वाचं असून या कराराअंतर्गत दुग्धोत्पादन, अन्नधान्य आणि भाजीपाला या क्षेत्रांमध्ये शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आलं आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री **शिवराज सिंग चौहान** यांनी म्हटलं असून हा दोन्ही देशांच्या समृद्ध भविष्यासाठीचा करार आहे, अशा शब्दात पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूमंत्री **हरदीप सिंग पुरी** यांनी समाधान व्यक्त केलं आहे. तर दोन्ही राष्ट्रांमधली धोरणात्मक आणि आर्थिक भागीदारी मजबूत करण्यासाठी हा करार म्हणजे एक मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री **नितीन गडकरी** यांनी व्यक्त केला आहे.

भारतीयांसाठी जागतिक घडामोडींचे रूपांतर प्रत्यक्ष संधींमध्ये करण्यासाठी हा करार म्हणजे एक मोठं पाऊल असल्याचं केंद्रीय दूरसंचार मंत्री **ज्योतिरादित्य सिंदिया** यांनी म्हटलं आहे. तर या अंतरिम कराराचा मसुदा म्हणजे पुढे टाकलेलं एक निर्णायक पाऊल असल्याचं भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष **नितीन नवीन** यांनी म्हटलं आहे. फिक्कीसह देशातल्या इतर उद्योग संघटनांनी याचं स्वागत केलं असून यामुळे देशात व्यापाराला नवीन गती मिळेल असं मत व्यक्त केलं आहे.

अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनीही या कराराच्या माध्यमातून होणाऱ्या व्यापार आणि आर्थिक सहकार्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं कौतुक केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मलेशिया दौऱ्यासाठी आज रवाना झाले. मलेशियाचे प्रधानमंत्री अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर विधायक चर्चेसाठी आपण उत्सुक

असल्याचं प्रधानमंत्र्यांनी दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. मलेशियातल्या भारतीयानी तिथल्या आर्थिक प्रगतीत मोलाचं योगदान दिल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्यात भारत आणि मलेशिया त्यांच्या सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीला अधिक दृढ करण्यासह द्विपक्षीय संबंधांचा सर्वंकष आढावा घेतील. व्यापार आणि अर्थव्यवस्था, उदयोन्मुख तंत्रज्ञान, ऊर्जा आणि शिक्षण यासह प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य मजबूत करण्यावर दोन्ही बाजूंकडून भर दिला जाईल, असं मलेशियातले भारताचे उच्चायुक्त बी.एन. रेड्डी यांनी सांगितलं. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी तिथल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधतील. दोन्ही देशांमधील जनतेच्या मजबूत संबंधांचं प्रतीक म्हणून क्वालालंपूरमध्ये 'सेलामत दातांग मोदी जी' हा मोठा सामुदायिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी भारतीय समुदायाने बँकाकच्या विमानतळावर जय्यत तयारी केली आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज छत्तीसगडमधे जगदलपूर इथं बस्तर पंडुम उत्सवाचं उद्घाटन केलं. बस्तर पंडुम उत्सवामुळे आदिवासींच्या समृद्ध संस्कृतीचं दर्शन होतं, बस्तरचे लोक एखाद्या उत्सवासारखं जीवन जगतात, असं त्या यावेळी म्हणाल्या. राष्ट्रपतींनी यावेळी बस्तर भागातल्या नक्षली चळवळविरोधातल्या कारवाईचं स्वागत केलं. नक्षलींविरोधात केलेल्या कारवाईमुळे या भागातलं भितीचं वातावरण संपलं असून विकासाची नवी पहाट उजाडली आहे, असं त्या म्हणाल्या.

**- - -होल्ड बाईट राष्ट्रपती - - -**

छत्तीसगडचे राज्यपाल रामेन देका आणि मुख्यमंत्री विष्णु देव साय हे या कार्यक्रमाला उपस्थित होते. बस्तर पंडुम उत्सवामधे विभागीय स्तरावरच्या स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं असून या स्पर्धा ९ फेब्रुवारीपर्यंत चालतील. यात ७०० हून अधिक कलाकार आपल्या कलांचं सादरीकरण करणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रात १२ जिल्ह्यांतल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आज सकाळी साडेसात वाजता मतदानाला उत्साहात सुरुवात झाली. एकूण ७३१ जिल्हा परिषद जागांसाठी २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत, त्यापैकी ३६९ जागा

महिलांसाठी, ८३ जागा अनुसूचित जातींसाठी, २५ जागा अनुसूचित जमातींसाठी आणि १९१ जागा इतर मागासवर्गीयांसाठी राखीव आहेत.

**<><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी भारतीय जनता पार्टीने रितू तावडे यांचं नाव आज जाहीर केलं, तर उपमहापौर पदासाठी शिवसेनेने संजय घाडी यांचं नाव जाहीर केलं आहे. भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी रितू तावडे यांच्या, तर शिवसेना नेते राहुल शेवाळे यांनी संजय घाडी यांच्या उमेदवारीची घोषणा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज सकाळी केली. शिवसेनेचे संजय घाडी १५ महिने उपमहापौर म्हणून काम करतील, शिवसेना आपल्या चार नगरसेवकांना उपमहापौर पदाचा कार्यकाळ विभागून देणार आहे. असं शिवसेना सचिव संजय मोरे यांनी यावेळी दिलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><>**

बीसीसीआय अर्थात भारत क्रिकेट नियामक मंडळाने १९ वर्षांखालील भारतीय पुरुष क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाला साडेसात कोटी रुपयांचं बक्षिस जाहीर केलं आहे. काल हरारे इथल्या हरारे स्पोर्ट्स क्लबमध्ये झालेल्या आयसीसी १९ वर्षांखालील पुरुष क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताने इंग्लंडचा १०० धावांनी पराभव करून सहाव्यांदा विश्वचषक विजेतेपद पटकावलं.

**<><><><>**

१९ वर्षाखालील विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धावांच्या फरकाच्या बाबतीत हा सर्वात मोठा विजय असल्यानं आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखालील भारताचा हा विजय ऐतिहासिक ठरला आहे. विश्वचषक विजयाबद्दल भारताच्या युवा क्रिकेट संघावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केंद्रीय युवक आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय यांनी भारतीय क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं.

**<><><><>**

क्रिकेट टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे. आजच्या ३ सामन्यांपैकी पहिला सामना, पाकिस्तान विरुद्ध नेदरलँड्स, श्रीलंकेतल्या कोलंबो इथं सुरू असून नेदरलँड्सनं पाकिस्तानसमोर विजयासाठी १४८ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

आजचा दुसरा सामना वेस्ट इंडिज विरुद्ध स्कॉटलँड असा असणार आहे. हा सामना कोलकाता इथं दुपारी ३ वाजता सुरू होईल, तर तिसऱ्या सामन्यात भारत आणि अमेरिका आमनेसामने असतील. हा सामना मुंबईतल्या वानखेडे स्टेडियमवर संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल.

//<><><><><>//